# उपविभागीय अधिकारी हवेली , उपविभाग पुणे, यांचेकार्यालय

७, निलगीरी बंगला, राणीचा बाग, अल्पबचत भवन मागे, पुणे-४११००१
दुरध्वनी -०२०-२६३३०८३२ Email-sdopune@gmail.com-

---

क्र.जमिन /कावि/६२४/२०२३ पुणे, दिनांक:१७ /०५/२०२३

प्रति
मा. प्रधान सचिव,
महसूल व वन विभाग (वने),
मंत्रालय मुंबई.

उपविभागीय अधिकारी, हवेली उपविभाग SUB DIVISIONAL OFFICER, HAVELI SUB DN. सत्यमेव जयते * PUNE * पुणे

विषय :- मौजे घेरा सिंहगड, ता. हवेली, जी. पुणे येथील गट न. १५३ (जुना स. न. ६६) मधील १ हेक्टर ३० आर मिळकतीबाबत महाराष्ट्र खासगी वने (संपादन) कायदा १९७५ सुधारित कायदा १९७८ मधील कलाम २२अ अन्वेय चौकशी करून दि. २४/१०/१९८० नंतर पारित केलेलं आदेशास केंद्र शासनाच्या परवानगीसाठी सादर करावयाच्या प्रस्तावाबाबत

संधर्भ :- १) या कार्यालयाकडील आदेश क्र. सहज/कवि/२५०/२००१ दि. २०/११/२००१
२) या कार्यालयाकडील सुधारित आदेश क्र. सहाज/कवि/९२२/२००२, दि. ०३/०१/२००३
३)अर्जदार श्रीमती राजश्री सुनिल जगताप यांचा दिनांक १६/०९/२०२१ रोजीचा मा. जिल्हाधिकारी सो पुणे यांचे कार्यालयातील अर्ज.
४)या कार्यालयाकडील अहवाल क्र. जमिन/कावि/१६३/०२२, दिनांक २१/०७/२०२२
५) मा. जिल्हाधिकारी सो पुणे (महसूल शाखा) यांचेकडील पत्र क्र. पमफ/कावि/५२०/२०२३, दिनांक ०४/०५/२०२३

**महोदय,**

उपरोक्त विषयाचे अनुषंगाने अर्जदार श्रीमती. राजश्री सुनिल जगताप यांनी मौजे घेरा सिंहगड ता. हवेली जि. पुणे येथिल गट नं १५३ ( जुना गट नं ६६) मधील १ हे ३० आर मिळकत महाराष्ट्र खासगी वने (संपादन) कायदा १९७५ सुधारित कायदा १९७८ मधील कलाम २२ अन्वये या कार्यालयाकडील आदेश क्र. सहज/ कावि/२५०/२००१ दिनांक २०/११/२००१ अन्वये पारित केलेला आदेश पुनःस्थापित करणेकामी केंद्र शासनाची परवानगी घेणेसाठी प्रस्तावित करणेकामी पत्रान्वये कळविले आहे.

अर्जदार यांचे विनंती अर्जाच्या अनुषंगाने मौजे घेरासिंहगड ता. हवेली जि. पुणे येथिल गट नं १५३ ( जुना गट नं ६६) मधील १ हे ३० आर मिळकत मध्ये या कार्यालयाकडील आदेश क्र सहज/कावि/२५०/२००१ अन्वये सदरची मिळकत खाजगी वनजमिन मधून वगळण्यात आले याबाबत

आदेश पारित करणेत आलेला होता. तसेच या कार्यालयाकडील सुधारित आदेश क्र. सहज/ कावि/९२२/ २००२, दिनांक ०३/०१/२००३, अन्वये केंद्र शासनाच्या पुर्वपरवानगी नंतर सदरचा आदेश लागू होईल असे नमूद केले आहे. तसेच या कार्यालयाकडील सुधारित आदेशा नुसार केंद्र शासनाकडून आवश्यक ती परवानगी मिळाल्यानंतर वरील आदेशा प्रमाणे कार्यवाही करणे बाबत नमूद केलेले आहे.

तरी सदर प्रकरणी मा. जिल्हाधिकारी कार्यालय, पुणे (महसूल शाखा) यांचेकडील पत्र क्र. पमफ/कवि/५२०/२०२३. दि. ०४/०५/२०२३ असे नमूद केले आहे कि सदर प्रकरणी महाराष्ट्र कासजी वने (संपादन) अधिनियम,१९७५ मधील कलाम २२अ, नुसार पुनर्स्थापित करण्यात आलेल्या क्षेत्राकरिता व (संवर्धन) अधिनियम. १९८० अंतर्गत केंद्र शासनाची परवानगी घेणे आवश्यकआहे.

उपवनसंरक्षक पुणे यांचेकडील पत्र क्र.डी-३/जमिन/९९/२००२-२००३ दिनांक २८/०४/२००३, तसेच उपवनसंरक्षक पुणे यांचेकडील पत्र क्र ब/कक्ष-३/ जमिन/२११८/२००१-२००२, दिनांक १९/१०/२००१ अन्वये महाराष्ट्र खाजगी वन (अधिग्रहन) अधिनियम १९७५ अंतर्गत अधिग्रहित केलेले क्षेत्र दिनांक ३०/०८/१९७५ पासून अधिग्रहित आणि शासनाकडे निहित करण्यात आले. दिनांक २५/०४/१९७८ च्या दुरुस्ती नुसार कलम २२अ अंमलबजावणी करणेत आली. सदर नियमावलीमध्ये १२.०० हेक्टर पेक्षा कमी क्षेत्र असल्याचे दिसून येते. तसेच मा जिलाधिकारी सो. यांचेकडील संदर्भीय पत्र क्र. ५ अन्वये केंद्र शासनाच्या पूर्वपरवानगी करिता विहित प्रमाणपत्र व शासन तरतुदीनुसार या कार्यालया मार्फत प्रस्ताव सादर करीत आहोत. तरी कृपया सदर प्रस्ताव वन संवर्धन अधिनियम १९८० खाली केंद्र शासनाची मान्यता प्राप्त होण्यासाठी परिशिष्ठासह केंद्र शासनाकडे सादर करणेस विनंती आहे.

सोबत या कार्यालयातील आदेश, सुधारित आदेश, मा. जिल्हाधिकारी पुणे (महसूल शाखा) यांचे पत्र व विहित नमुन्यातील १ ते १४ रकान्यामधील परिशिष्ट मधील माहिती पुढिल कार्यवाहीसाठी सविनय सादर.

उपविभागीय अधिकारी, हवेली उपविभाग SUB DIVISIONAL OFFICER, HAVELI SUB DN. * PUNE * पुणे

आपला विश्वासू

( संजय असवले)
**उपविभागीय अधिकारी हवेली**
**उपविभाग पुणे**

**प्रत :- मा. जिल्हाधिकारी सो पुणे (महसूल शाखा) यांना माहितीस्तव सविनय सादर.**

प्रत:- (१) श्रीमती राजश्री सुनील जगताप, हिंगणे खुर्द, ता. हवेली, ४११०५१.
(२) मा. उप वन संरक्षक पुणे विभाग, सेनापती बापट मार्ग, ४११००४.
(३) मा. मुख्य वनसंरक्षक, (प्रादेशिक) पुणे, "वनभवन" भांबुर्डा वन विहार,गोखले नगर, ४११०१६.

महाराष्ट्र खासगी वन (संपादन) १९७५ चे कलाम २२-अ नुसार दि २५/१०/१९७५ नंतर दिलेल्या निर्णया बाबत केंद्र शासनाची परवानगी घेणे कामी

| अ. क्र. | प्रकरण क्र. | गावाचे नाव | तालुका | चौकशी रजि क्र. | खातेदाराचे नाव | शासनाकडे वर्ग झालेले क्षेत्र स.न./हि.न. | क्षेत्र हे. आर. | आकार प्रति. | खातेदारास परत करणेत आलेले क्षेत्र स.न./हि.न. | क्षेत्र हे. आर. | आकार प्रति. | निर्णयाची तारिक | शेरा |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ | ८ | ९ | १० | ११ | १२ | १३ | १४ |
| १ | | घेरा सिंहगड | हवेली | | राजश्री सुनील जगताप | - | - | - | गट न. १५३ (जुना स. न. ६६) | १.३० | १.२८ | २०/११/२००१ | उपविभागीय अधिकारी हवेली, उपविभाग पुणे यांचे कडील आदेश क्र. सहाज/कवि/२५०/२००१, दिनांक २०/११/२००१ रोजी कलाम २२-अ अन्वेये आदेश पारित करून सादर आदेशात १ हेक्टर ३० आर खातेदार राजश्री सुनील जगताप यांचे नांवे परत करण्यात आले आहे. |

उपविभागीय अधिकारी, हवेली, उपविभाग SUB DIVISIONAL OFFICER, HAVELI SUB DN. * PUNE * पुणे

उपविभागीय अधिकारी, हंवेली

उपविभाग पुणे,